# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 20.06.2024** **वार – गुरुवार**

---

**HCMTR प्रकल्प**

पुणे शहरातली वाहतूक कोंडी कमी करण्यासाठीचा उच्च क्षमता द्रुतगती वर्तुळकार मार्ग म्हणजेच HCMTR वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा करण्याची ग्वाही केंद्रिय सहकार आणि नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली. या मार्गांसाठी जागा आरक्षित करण्यास राज्य सरकारनं नुकतीच मंजुरी दिली आहे. त्यासाठी काल राज्याच्या नगरविकास विभागानं अधिसूचना जारी केली आहे. संपूर्ण उन्नत असलेला हा ३६ किलोमीटर लांबीचा मार्ग असेल.

**नो पार्किंग दंड**

रस्त्यावरील नियमबाह्य वाहनतळावर कारवाई करण्याबाबत पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार वाहनचालक उपस्थित असताना, नियमबाह्य वाहन लावणे, चुकीचे वाहन लावणे यासाठी कारवाई केल्यास, गाडीचालकाकडून गाडी ओढून नेण्याचा दंड घेता येणार नाही. अनधिकृतपणे वाहन उभे असल्यास ते टोईंग करुन नेणाऱ्या खासगी आस्थापनेच्या कामगारांच्या अरेरावी संदर्भात पोलिस आयुक्तांकडे तक्रारी आल्यानंतर हे परिपत्रक जारी करण्यात आलं. पोलिस आयुक्तालयात टोईंग कंपनीचे प्रतिनिधी आणि कर्मचारी यांची बैठक घेण्यात आली, त्यात पोलिस आयुक्तांनी मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

**आरोग्य आवाहन**

आगामी पावसाळ्याचा पार्श्वभुमीवर डेंग्यू, मलेरियासह जलजन्य आजारांचा धोका वाढत असल्यानं पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून जनजागृती करण्यात येत आहे. पुणेकरांनी आरोग्याची काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. सर्दी, ताप, खोकला, घसादुखी अशी लक्षणं आढळल्यास तात्काळ उपचार घ्यावेत तसंच पुणे महापालिकेच्या दवाखान्यात संपर्क साधावा. असं आवाहन पुणे महापालिकेचे सहाय्यक आरोग्य प्रमुख डॉक्टर सुर्यकांत देवकर यांनी केले आहे.

**कात्रज**

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात कात्रजला गेल्या वर्षी 2023-24 मध्ये सुमारे तीन कोटींचा नफा झाला असल्याची माहिती संघाचे अध्यक्ष भगवान पासलकर यांनी दिली आहे. संघाच्या दूध, दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीत वाढ करण्यासाठी विपणन तज्ज्ञांची नेमणूक करण्यात आली असल्याचंही पासलकर यांनी सांगितलं.

**<u>आळंदी दिठी</u>**

आळंदी -पंढरपूर पालखी मार्गावरील प्रमुख 10 गावांमध्ये 25 जून ते 17 जुलै या काळात पालखी सोहळ्यावर आधारित दिठी हा मराठी चित्रपट दाखवण्यात येणार आहे. या चित्रवारीची सुरुवात आळंदीतून पंचवीस जूनला उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>खडकी रेल्वे</u>**

पुण्यातल्या खडकी रेल्वे स्थानकावर दोन नवीन फलाट बांधण्याचा निर्णय मध्य रेल्वेकडून घेण्यात आला आहे. पुणे रेल्वे स्थानकावरचा अतिरिक्त ताण कमी करण्यासाठी हडपसर आणि खडकी रेल्वे स्थानकाच्या विस्ताराचे काम हाती घेण्यात येणार आहे. खडकी रेल्वे स्थानकावर मुंबईकडे जाणाऱ्या  गाड्या उभ्या करण्यासाठी अथवा या गाड्या इथूनच सुरु करण्याच्या दृष्टीनं याचा फायदा होईल.

**<u>पुणे खराडी फीडर</u>**

पुण्यातल्या रामवाडी मेट्रो स्थानकापासून खराडीतल्या ईऑन आयटी पार्क पर्यंत मेट्रो फीडर बससेवा पुणे महानगर परिवहन अर्थात पीएमपीएमएल कडून सुरु करण्यात आल्याचं हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटले आहे. या सेवेचा प्रारंभ पीएमपीएमलचे व्यवस्थापकीय संचालक डॉक्टर संजय कोलते आणि महा मेट्रो रेल पुणे चे संचालक विनोद अग्रवाल यांच्या हस्ते नुकताच झाला.

**<u>पिंपरी चिंचवड मालमत्ता कर</u>**

पिंपरी चिंचवड पालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागाच्या वतीनं केलेल्या जनजागृतीचा परिणाम म्हणून गेल्या अडीच महिन्यात पन्नास टक्के मालमत्ताधारकांनी कर भरला आहे. आत्तापर्यंत 3 लाख 9 हजार 233 नागरिकांनी कर भरणा केला आहे.

**<u>उसजात</u>**

पुण्याजवळच्या मांजरी इथल्या वसंतदादा साखर संस्थेनं विकसित केलेल्या नवीन जातीच्या उसाची लागवड राज्यात करण्यास भारतीय कृषी संशोधन आणि विकास परिषदेच्या समितीनं मान्यता दिली आहे. वसंतदादा साखर संस्थेच्या विविध संशोधन केंद्रात गेल्या सुमारे दोन वर्षांपासून उसाच्या या नवीन प्रजातीवर प्रयोग सुरु होते.

**<u>कोथिंबीर</u>**

सामान्यांच्या ताटातल्या पदार्थाला सजवणाऱ्या कोथिंबीरीचे दर किरकोळ बाजारात 80 ते 100 रुपयांपर्यंत गेले आहेत. पावसाने दडी मारल्यानं सर्वच भाज्यांचे दर वाढल्यानं त्याचा ग्राहकांनाही फटका बसतोय.

**<u>मान्सून लीग</u>**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटना मान्यताप्राप्त स्पार्टन मान्सून लीग अजिंक्यपद स्पर्धेत कल्याण इलेव्हन संघाने विट्रॉन ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स संघाचा 4 गडी राखून पराभव करत स्पर्धेत विजयी सलामी दिली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी बरसल्या, मात्र दमदार पावसाची अद्याप प्रतीक्षा आहे. शहरात कमाल तापमान 24 पूर्णांक 2 दशांश अंश तर किमान तापमान 22 अंश नोंदवले गेले. उद्याही हवामानात फारसा बदल संभवत नसल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**